# Level 3 -- Reading passages -- Exam 2015

पुष्कळदा पाऊस पडत असताना ऊन पडले की इंद्रधनुष्य दिसते. सूर्याचे किरण एका ठराविक कोनात पाण्याच्या थेंबामधून जातात. जेंव्हा पांढरा प्रकाश थेंबातून जातो तेंव्हा तोच प्रकाश वेगवेगळे रंग होऊन बाहेर पडतो. लाल, नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा, जांभळा असे सात रंगाचे इंद्रधनुष्य दिसते. असे इंद्रधनुष्य कधी कधी धबधब्यात तर कधी उडणाऱ्या कारंज्यात दिसते. तुम्ही कधी दुहेरी इंद्रधनुष्य पाहिले आहे का? एकाच वेळी दोन कमानी दिसतात. पौर्णिमेच्या रात्री जर आकाश स्वच्छ असेल तर योसेमिटी धबधब्यावर इंद्रधनुष्याची कमान दिसते. त्याला चंद्रधनुष्य म्हणतात. खरे वाटत नाही ना?

प्रश्न

१) इंद्रधनुष्य का दिसते?

२) इंद्रधनुष्य केंव्हा दिसते?

३) इंद्रधनुष्याचे रंग सांगा.

४) आणखी इंद्रधनुष्य कोणत्या ठिकाणी दिसते?

५) रात्री इंद्रधनुष्य दिसते का?

# Level 3 -- Reading passages -- Exam 2015

शाळेत जातांना डाव्या हाताला हिरवीगार टेकडी आहे. टेकडीला लागून असलेल्या मैदानावर उगवलेले गवत पाहून आशूने सायकलचे ब्रेक दाबले. हिरवेगार गवत पाहिल्यावर आशूला तेथे थांबण्याची इच्छा झाली. गवतामध्ये गर्द हिरवा, पोपटी, पिवळसर अशा रंगाच्या छटा होत्या. मध्येच काही फुलेही उगवली होती. पांढरी, पिवळी, निळी, जांभळी. अशा लहान मोठ्या फुलांमुळे आशूला ते हिरवेगार गवत फारच आवडले होते. आशूने आनंदाने गवतावर लोळण घेतली.

प्रश्न
१) शाळेत जातांना आशू कां थांबली?
२) मैदानावर कोणत्या प्रकारचे गवत पसरले होते?
३) आशूने कोणत्या रंगांची फुले पाहिली?
४) गवतावर लोळतांना आशूला काय दिसले?
५) तुम्ही असे एखादे दृश्य पाहिले आहे काय? ५ वाक्यात सांगा.